23

**दिनांक ५ जून, २०१२ जागतिक पर्यावरण दिन साजरा करण्याबाबत-**

महाराष्ट्र शासन
पर्यावरण विभाग
शासन निर्णय क्र.इएनव्ही-२०११/प्र.क्र.११३/तां.क.३
१५ वा मजला, नवीन प्रशासन भवन
मादाम कामा रोड, मंत्रालय, मुंबई- ४०००३२
दिनांक : १८ जानेवारी, २०१२

**प्रस्तावना :**

पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन हे जनसमुदायाच्या सक्रिय सहभागाशिवाय होणे शक्य नाही. यासाठी पर्यावरण विषयक बाबींची जाणीव जनमानसांत निर्माण होणे आवश्यक आहे. पर्यावरण विषयक जनजागृती करण्याच्या उद्देशाने राज्यस्तरावर समाजातील विविध घटकांचा समावेश असलेली "सृष्टीमित्र" पारितोषिक ही योजना सन २०१०-११ आर्थिक वर्षापासून राबविण्यात येत आहे.

**शासन निर्णय :**

पर्यावरण विषयक व्यापक जनजागृती करण्यासाठी दिनांक ५ जून, २०१२ या जागतिक पर्यावरण दिनानिमित्त "सृष्टीमित्र पारितोषिक" हया योजनेखाली राज्य स्तरावर विविध स्पर्धांचे आयोजन करण्यास या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर स्पर्धा विविध गटांसाठी आयोजित होणार असून, त्यात शालेय व महाविद्यालय प्रकल्प, छायाचित्र, बालसाहित्य, बोधचिन्ह आणि स्लाईड-शो अशी वर्गवारी असणार आहे. सदर स्पर्धेचे आयोजन पर्यावरण विभाग हे सेंटर फॉर एन्व्हायर्नमेंट एज्युकेशन, (CEE), पुणे यांचेमार्फत करण्यास या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात येत असून, सेंटर फॉर एन्व्हायर्नमेंट एज्युकेशन, पुणे यांनी या कामासाठी प्रस्तावित केलेल्या खर्चाच्या बाबी पुढीलप्रमाणे:

| Description | Amount in Rs. |
|---|---|
| Publicity (Print) material creation | 30,000 |
| Newspaper Advertisement | 1,00,000 |
| Poster Printing, Distribution 4000 copies | 1,80,000 |
| **Website :-**<br>i) Content Writing for the Website Rs. 30,000, and<br>ii) Website Designing by Software Personnel and Web Hosting (Domain, Server Space, etc) Rs. 50,000 | 80,000 |
| Evaluation to Entries | 60,000 |
| Travel and acco, food etc. for winners of 20 categories – 3 to 4 winners per category total about 80 winners Rs. 6000*80 | 4,80,000 |
| Exhibition of Best 40 Entries (Projects / Photos) Design and Printing @ approx Rs. 1000 | 40,000 |
| Design, Content Development and Coordination Costs | 3,50,000 |
| Book / Souvenir Produced from winning entries (4 colour x 1000 copies) | 3,00,000 |
| Prize money (see detail below)* | 2,18,000 |
| Award Ceremony and Exhibition of posters | 3,50,000 |
| Communication, Photocopy, Postage and Dissemination of Souvenir | 1,00,000 |
| Administration @ 10% | 2,28,800 |
| **Total** | **25,16,800** |

३. सेंटर फॉर एन्व्हायर्नमेंट एज्युकेशन, पुणे यांनी प्रस्तावित केलेल्या एकूण रु. २५,१६,८००/- एवढया खर्चास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे. खर्चाचा तपशिल, त्यातील बदल तसेच स्पर्धेचा सादर तपशिल व त्यात प्रसंगत्वे करावयाचे बदल याबाबतचा अधिकार पर्यावरण विभागाकडे असतील.

४. यासाठी होणारा खर्च मागणी क्र. यू.-४-३४३५-परिस्थितीकी व पर्यावरण, ०४, प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण १०३, वायू व जल प्रदूषण प्रतिबंध, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-राज्य योजनांतर्गत योजना,(०२)(१३) पर्यावरण जनजागृती, शिक्षण, हवामान बदल कृति आराखडा (३४३५ १३०५) ३१, सहाय्यक अनुदाने या लेखाशिर्षाखाली मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. सन २०११-१२ या आर्थिक वर्षी उपरोक्त लेखाशिर्षाखाली एकूण रु. ३००.०० लक्ष तरतूद उपलब्ध आहे.

५. सदर शासन निर्णय नियोजन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. १९१/१४६१ दिनांक ९.११.२०११ अन्वये दिलेल्या अनुमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर www.maharashtra.gov.in उपलब्ध असून त्याचा संगण सांकेतांक क्र. २०१२०२२२०६४५०८२८००१ आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या नावाने व आदेशानुसार,

(के. के. मानकर)
अवर सचिव (पर्यावरण), महाराष्ट्र शासन

प्रत:

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
२. मा. उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. मंत्री (पर्यावरण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा. राज्यमंत्री (पर्यावरण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मुख्य सचिव यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
६. प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
७. प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
८. संचालक, सेंटर फॉर एन्व्हायर्नमेंट एज्युकेशन, सेंट्रल रिजन सेल, पुणे
९. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सायन, मुंबई
१०. सचिव (पर्यावरण) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
११. महालेखापाल (लेखा व अनुज्ञयेतना / लेखापरिक्षा) महा-१ व महा-२, मुंबई/नागपूर
१२. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१३. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१४. वित्त विभाग (अर्थ-५/व्यय-१६), मंत्रालय, मुंबई
१५. पर्यावरण विभागातील सर्व कार्यासन
१६. निवड नस्ती